झाडू- २ (नव्या पद्धतीच्या घरात फरशीवर वापरण्यात येणारा झाडू)

चित्र पाहण्याकरता येथे क्लिक करा - **झाडू- २ (नव्या पद्धतीच्या घरात फरशीवर वापरण्यात येणारा झाडू)**

**नोंदीत दिलेल्या पर्यायी शब्दांचा क्रम हा त्यांच्या एकूण सर्वेक्षणातील वारंवारितेनुसार दिलेला आहे याची नोंद घ्यावी.**

नव्या पद्धतीच्या घरात फरशीवर वापरण्यात येणारा 'झाडू' या संकल्पनेसाठी महाराष्ट्रात आढळून आलेले शब्दवैविध्य पुढीलप्रमाणे -

सदर संकल्पनेकरता झाडू, जाडू, झाडु, झारू, झाळू, झाडी, झाडवन, झाडवा, सिंदिचा, शिंदीचा झाडू, स्टाईल झाडू, फुलझाडू, साळूझाडू, झाडणी, झाडणा, झाळनी, झान्नी, झाण्णो, खराटा, खट्टा, किरसुनी, केरसुनी, करसुंडी, केरसुली, फडा, फडी, बाहरी, भारा, बाहरा, भारो, बायरी, बाहेरी, भाडी, बडी, बाडी, बेरा, भायडी, बोअरी, बागबाहरी, मोळ, मोल, मवाली, मोवळ, मोळाची, मवेलू, सिराई, शिराउ, शिरवा, शिरावा, शिराई, शिराव, शिरी, शिप्री, कुच्रा, कुच्र्चा, कुंच्रा, कुच्र्चा झाळू, साळूता, साळाता, साउता साळाती, साळोता, साळूचा, सलाते, सलाटा, सराटा, हालतो, बुतारी, बुतारा, भुतारी, बुतुरा, वाडवन, वाढवन, वरवन, घोळ, सारन, सान, मय्रा (मय्-रा), मयेर, मयुरी, मयेरी, मवेरा, मोयडा, कैसर, कयसार, केस्री, कसुर, लोटना, लक्ष्मी, बासोर, बासवरो, बोख्री, जुनू, मुट, पिशी, मुगडा, बुडुक, मुलाम इत्यादी शब्द आढळून आले आहेत.

यापैकी झाडू आणि त्याचे ध्वन्यात्मक वैविध्य असणारे झारू, झाळू इ. शब्द महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांत दिसून आले. त्याचबरोबर रायगड, पालघर, धुळे, नंदुरबार आणि गडचिरोली या जिल्ह्यांत बाहरी आणि त्याचे ध्वन्यात्मक वैविध्य असणारे बायरी, बाहेरी, बाडी इ. शब्द आढळून येतात.

या सामग्रीचे अधिकार क्रिएटिव्ह कॉमन्सच्या श्रेयनिर्देशन-समवितरण ४.० आंतरराष्ट्रीय या परवान्याअंतर्गत मुक्त करण्यात येत आहेत.
परवान्याच्या मजकुरासाठी पुढील दुवा पाहता येईल.
https://creativecommons.org/licenses/by-sa/4.0/